**प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटीचे मॉडर्न कॉलेज कला, विज्ञान, वाणिज्य महाविदयालय गणेशखिंड पुणे 16**

# करिअर कट्टा

## अहवाल 24-25

महाराष्ट्र राज्य उच्च व तंत्र शिक्षण विभाग व महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान सहायता केंद्र आणि प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटीचे,मॉडर्न कॉलेज ऑफ आर्ट, सायन्स अँड कॉमर्स, गणेश खिंड यांच्यासंयुक्त विद्यमाने आयोजित, राज्यस्तरीय युवा विकास केंद्र धोरण निश्चिती व राज्यस्तरीय पोलीसभरती पूर्व प्रशिक्षण कार्यशाळा 2024 दिनांक 24 व 25 नोव्हेंबर 2024 रोजी यशदा, पुणे येथे यशस्वीरित्या पार पडली.

उद्घाटनानंतर सभेमध्ये खालील विषयांवर सविस्तर चर्चा करण्यात आली.

1. नागपूर कार्यशाळेमध्ये घेतलेले निर्णय व त्याची अंमलबजावणी यांचा आढावा मा. शितोळे सर यांच्यामार्फत घेण्यात आला. गेल्या वर्षभरात करिअर कट्टामार्फत पूर्णत्वास आलेली उद्दिष्टे आणि न झालेले काम यांची कारणांसह चर्चा करण्यात आली.

2. करियर कट्ट्याचे पुढील पाच वर्षाचे उद्दिष्ट निश्चित करून अंमलबजावणीचा आराखडा तयार करण्यात आला. यामध्ये पुढील पाच वर्षात दहा लाख विद्यार्थी प्रशिक्षित होतील अशी ग्वाही सर्व करिअर कट्ट्याच्या पदाधिकाऱ्यांतर्फे मा.शितोळे सर यांनी केली. यामध्ये ऑनलाइन ट्रेनिंग, युथ डेव्हलपमेंट सेंटर, फूड व्हॅन, मोटर ड्रायव्हिंग ट्रेनिंग, स्किल डेव्हलपमेंट सेंटर यांच्या निर्मिती व कार्यपद्धतीवर सविस्तर चर्चा करण्यात आली.

3. स्टेट रिसोर्स सेंटर निवडणे व त्याची कार्यपद्धती निश्चित करणे याबाबत चर्चा करण्यात आली. यामध्ये यूपीएससी, एमपीएससी, पी एस यु, कार्पोरेट प्लेसमेंट, बँकिंग स्पर्धा परीक्षा मुलाखती, उद्योजकता विकास, ओव्हरसीज प्लेसमेंट, रेल्वे पोस्ट व इतर केंद्र शासनाच्या आस्थापनांवरील भरती प्रक्रिया, पदवी आणि पदव्युत्तर शिक्षण घेत असणाऱ्या विद्यार्थ्यांना मिळणाऱ्या फेलोशिप, स्कॉलरशिप व संशोधन निधी या विषयांवर सविस्तर चर्चा करण्यात आली.

4. सेंटर ऑफ एक्सलन्स चा कृती आराखडा निश्चित करण्यात आला.

5. युवा विकास केंद्रामध्ये संभाव्य उपक्रमाच्या यशस्वीतेसाठी निवृत्त प्राचार्य प्रवर्तकांचा सहभाग वाढवण्यासाठीचे धोरण निश्चित करताना नियामक मंडळाची बैठक, सेंटर ऑफ एक्सलन्सच्या नियमित बैठका तसेच राज्यस्तरीय समितीच्या बैठका यांचे वेळापत्रक निश्चित करण्यात आले.

6. विभागनिहाय विशेष उपक्रमांची आखणी करत असताना आदिवासी व नक्षलग्रस्त विभागातील विद्यार्थी संख्या वाढविण्यासाठी करण्यात येणाऱ्या कार्यावर आणि विद्यार्थ्यांच्या फी रचनेवर सविस्तर चर्चा करण्यात आली.

7. महाविद्यालयीन स्पर्धेच्या नियमावलीत काही आवश्यक ते बदल करण्यात आले.

8. दि. 25 नोव्हेंबर 2024 रोजी राज्यस्तरीय पोलीस भरतीपूर्व प्रशिक्षण कार्यशाळा पार पडली तसेच राष्ट्रीय शैक्षणिक धोरण विशेष अंकाचे प्रकाशन करण्यात आले.






सर्वांगीण
विकासासाठी
राज्यस्तरीय